मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) 401 101
दुरध्वनी : 022-28192828/28193028 ईमेल -swmhealth@mbmc.gov.in

घनकचरा व्यवस्थापन विभाग

निविदा पत्रक 2026-27

निविदेचे नांव	:-	मनपा. क्षेत्रातील शौचालय साफसफाई करीता दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तु पुरवठा करणे.
निविदा फॉर्म फी	:-	रु. 7,080/- (टेंडर फी + GST) ई-टेंडरिंग वेबसाइट वरील ऑनलाइन पावती प्रणालीद्वारे पैसे भरणा करणे. (ना-परतावा)
निविदा बयाणा रक्कम	:-	रु. 50,000/-
निविदा पत्रके विक्री व स्विकारण्याची अंतिम तारीख	:-	दि. 28/10/2026 ते दि. 03/11/2026 दुपारी 1.00 पर्यंत.
ऑनलाई निविदा उघडण्याची तारीख	:-	दि. 04/11/2026 दुपारी 1.00 पर्यंत.
अंदाजीत निविदा रक्कम	:-	रु. 24,91,800/-

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) 401 101
दुरध्वनी : 022-28192828/28193028 ईमेल -swmhealth@mbmc.gov.in

घनकचरा व्यवस्थापन विभाग

सन 2026-27

<u>लिफाफा क्र. 1 :- तांत्रिक पात्रता निकष</u> निविदेत पात्र होण्यासाठी निविदाकाराने खालील कागदपत्रे ऑनालाईन पध्दतीने सादर करावीत. तांत्रिक पात्रता निकष खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	निविदा अटीशर्ती
1.	निविदेची फी (Tender Form Fee)
2.	बयाणा रक्कम – (Earnest Money Deposit) (EMD)
3.	GST नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate)
4.	पॅन कार्ड प्रमाणपत्र (Pan Card Certificate)
5.	दुकाने नोंदणी नुतनीकरण प्रमाणपत्र (Shop & Establishment Registration Act Certificate Renewal)
6.	उत्पादक कंपनी किंवा कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याबाबतचे चालु वर्षातील प्रमाणपत्र. (Manufacturer / Authorized Distributors of the Company Certificate)
7.	<u>सरासरी वार्षिक उलाढाल :-</u> निविदाकाराची मागील 3 आर्थिक वर्षाची (2022-23, 2023-24, 2024-25) सरासरी वार्षिक उलाढाल कामाच्या किंमतीच्या किमान 75% असावी. (याबाबत उलाढाल प्रमाणपत्र (Turnover Certificate) Chartered Accountant (सनदी लेखापाल) यांनी प्रमाणित केलेले असावे.
8.	<u>अनुभव</u>– निविदाकाराने मागील 3 आर्थिक वर्षात (2022-23, 2023-24, 2024-25) मध्ये **किटक नाशक, दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तु पुरवठा करणे कामाचा** शासकीय/ निम शासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये खालीलप्रमाणे केलेले असणे आवश्यक आहे. **(अनुभवासाठी निविदाकाराने प्रत्यक्ष काम केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. कार्यादेश चालणार नाही.)** i) निविदा किंमतीच्या 80% चे एक काम किंवा ii) निविदा किंमतीच्या 50% ची दोन कामे किंवा iii) निविदा किमतीच्या 40% ची तीन कामे
9.	दुर्गंधी नाशक साठविणे व वितरण करणे बाबत सक्षम प्राधिकरणाचा चालु वर्षाचा परवाना (License to Sell, Stock or Exhibit for sale of Distribution of Insecticide from Department of Agriculture for current year.)
10.	निविदा सादर करे पर्यंत निविदाकार इतर कोणत्याही सरकारी/ निम शासकीय/ महामंडळात काळ्या यादीत टाकले जाणार नाही. बोलीदार संस्था एक हमीपत्र अपलोड करेल.
11.	निविदाकाराने निविदेसोबत सादर केलेल्या दस्ताऐवजांची सत्यता दर्शविणारे रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र

<u>निविदा अटीशर्ती</u>

1. निविदाकाराने सशर्त निविदा भरल्यास सदरची निविदा स्विकारली जाणार नाही.
2. निविदा भराताना निविदा फॉर्म फी व इसारा रक्कम https:\\mahatenders.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन रिसिप्ट सिस्टीमद्वारे भरणा करण्यात यावी. अन्यथा निविदा ग्राह्य समजण्यात येणार नाही.
3. तांत्रिक लिफाफा (Technical Bid) मध्ये वरील प्रमाणे आवश्यक कागदपत्रे online सादर करावीत.

4. दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तुचा पुरवठा मुळ निविदेत नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे करावा लागेल.
5. निविदेतील अनुक्रमांक 01 ते 12 करीता मुळ उत्पादक कंपनी / कंपनीचे अधिकृत विक्रेते यांनीच पुरवठा करणे बंधनकारक आहे. ज्या उत्पादनाकरीता निविदाकाराने उत्पादक कंपनी अथवा अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर केले असेल त्या निविदाकारानेच त्या विशिष्ट उत्पादना करीता निविदा सादर करावी.
6. निविदाधारक जर उत्पादक कंपनी अथवा कंपनीचे अधिकृत विक्रेते नसल्यास त्यांची निविदा स्विकारली जाणार नाही.
7. कार्यादेश मिळाल्यानंतर दुर्गंधी नाशके पुरवठा करताना शासकीय मान्यता प्राप्त प्रयोग शाळेत (Govt. approved Laboratory) तपासून प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास देयके प्रदान केली जाणार नाही.
8. पुरवठा करण्यात येणारे दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तु हे नामांकित व ISO प्रमाणित असणे आवश्यक आहे.

<u>लिफाफा क्र. 2 :- (दर लिफाफा) - निविदाकाराने दराचा लिफाफा भरताना खालील बाबी लक्षात घेण्यात याव्यात.</u>

9. निविदाधारकाने सादर केलेला तांत्रिक लिफाफा (Technical Bid) मध्ये आवश्यक ती कागदपत्रे असल्यास दराचा लिफाफा (Financial Bid) उघडण्यात येईल.
10. कार्यादेशात नमुद केलेल्या दुर्गंधी नाशक /साहित्य वस्तु इत्यादींचा परिमाणा व्यतीरिक्त महानगरपालिकेस जादा परिमाणाची आवश्यकता लागल्यास, त्याच मंजुर दराने निविदाधारकास पुरवठा करावा लागेल.
11. निविदा भरतांना प्रत्येक बाबीचे दर सर्व कर (उदा. GST, किंवा निविदा भरताना लागू असलेले इतर कर इ.) धरुनच व इतर खर्च (उदा. वाहतुक, पॅकिंग इ.) यासह भरण्यात यावे.
12. शासकीय करांमध्ये कोणतेही बदल झाल्यास ते दोन्ही पक्षकारांवर बंधनकारक राहील.
13. दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तुचा पुरवठा कार्यादेशात नमुद केलेल्या कालावधीमध्ये निविदाधारकांना करावा लागेल. निविदाधारकास योग्य कारणाशिवाय व पुरवठा आदेशाची मुदत संपण्यापुर्वी अर्ज केल्या शिवाय मुदतवाढीचा विचार केला जाणार नाही.
14. कार्यादेश दिलेल्या मुदतीत दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तुचा पुरवठा न केल्यास प्रती दिन रु. 500/- दंड आकारण्यात येईल.
15. निविदाधारकाने निविदेतील अनुक्रमांक 01 ते 12 मध्ये दर्शविलेले दुर्गंधी नाशक पुरवठा केल्यापासुन पुढील 01 वर्षापर्यंत Expiry Date असणे बंधनकारक आहे.
16. महानगरपालिकेस दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तु पुरवठाचे काम पुर्ण झाल्यानंतर इसारा रक्कम सहा महिन्यानंतर मुळ पावतीसह अर्ज प्राप्त झाल्यास परत देण्यात येईल, त्या रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
17. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचित ड मधील नियम 1 प्रकरण 5 नुसार रु. 500/- पेक्षा जास्त रकमेचा समावेश असलेले कंत्राट मनपाच्या मुद्रेसहित शिक्का मोर्तब करुन, नियम 2 मध्ये नमुद केल्यानुसार स्वाक्षरी घेण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल.
18. मंजुर निविदाकारास शासन निर्णयानुसार रुपये 5.00 लक्षापर्यंत रुपये 500/- व त्यापुढील रक्कमेवर 0.3 टक्के इतकी रक्कम मुद्रांक शुल्क भरणा करुन चलन सादर करणे आवश्यक आहे.
19. निविदा स्विकारल्यानंतर निविदाधारकाला लेखी कळविण्यात येईल आणि तसे कळविल्यानंतर निविदाधारकाने स्वखर्चाने अधिकृत स्टँपपेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहिल.
20. निविदाधारक यांनी करारनामा लिहून दिल्यावर महानगरपालिकेने मागणी केल्यानंतर तात्काळ ठरवून दिलेल्या ठिकाणी विहीत मुदतीत दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तु पुरवठा करणे बंधनकारक राहील.

21. मंजुर निविदाधारकाकडून नियमाप्रमाणे आयकर व अन्य कर देयकातून कापून घेण्यात येतील.
22. सुरक्षा अनामत म्हणुन 5% (अतिरिक्त सुरक्षाअनामत 3% रक्कम बँक गॅरंटी स्वरुपात स्विकृत पत्र दिल्यानंतर भरणा करणे तसेच प्रत्येक देयकातून 2% सुरक्षा अनामत) आयकर व इतर कर नियमानुसार कपात करण्यात येईल.
23. निविदा सोबत भरलेल्या अनामत रक्कमेवर कोणत्याही स्वरुपात व्याज दिले जाणार नाही. तसेच मालाचे / साहित्याचे पुरवठ्याबाबतचे कोणतीही आगाऊ रक्कम महानगरपालिकेकडून पुरवठादाराला दिली जाणार नाही.
24. नैसर्गिक आपत्ती उदा. आग, पुर, वादळ, वीज पडणे, भुकंप, ज्वालामुखी तसेच अपघात यामुळे व संप, संचारबंदी, टाळेबंदी यामुळे होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महानगरपालिका जबाबदार असणार नाही, कुठलीही भरपाई मिळणार नाही.
25. मंजुर निविदेतील किंवा कोणतेही बाबतीत काहीही वाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त यांचा निर्णय अंतिम दोन्ही पक्षांवर बंधनकारक राहील. तसेच कायदेशिर कारवाई उभय बाजुनी झाल्यास दोन्ही बाजुच्या खर्चाची संपूर्ण जबबादारी निविदाधारकावर राहील. कोणत्याही कारणास्तव प्रकरण न्याय प्रविष्ट झाल्यास कनिष्ठ व जिल्हा मा. न्यायालय ठाणे व उच्च मा. न्यायालय मुंबई उच्च हे क्षेत्र कायदेशिर दाव्यासाठी बंधनकारक राहील.
26. महानगरपालिकेस प्राप्त सर्व अथवा कोणत्याही निविदा अंशत: किंवा पूर्णपणे कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका हे राखून ठेवीत आहे.
27. कंत्राट कालावधीतील कामाबाबत कोणताही लेखा आक्षेप आल्यास वसुली निघाल्यास त्याची पुर्तता करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील

(प्रणाली घोंगे)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) 401 101
दुरध्वनी : 022-28192828/28193028 ईमेल -swmhealth@mbmc.gov.in

घनकचरा व्यवस्थापन विभाग

सन 2026-27

// दराचा लिफाफा //

कामाचे नाव :- मनपा. क्षेत्रातील शौचालय साफसफाई करीता दुर्गंधी नाशक व साहित्य वस्तु पुरवठा करणे.

Sr. No	Description of item	Total amt. in Rs. (including All Taxes)
1.	Germitox Powder D.p. monochlorophenol Dusting powder)	Per Kg.
2.	Germonil Liquid monochlorophenol with Dcmx Liquid)	Per Ltr.
3.	Odotreat Odor Control Powder Benzalkonium chloride Powder)	Per Kg.
4.	CarboPhenyl Powder D.P. Carbolic Powder)	Per Kg.
5.	Virotex Benzalkonium Chloride50% Purity) 20% w/w)	Per ltr.
6.	Zink Posphide Powder ISI Mark	Per Kg.
7.	Disinfectants Liquid for hand Cleaning	Per Ltr.
8.	Phenyl liquid	Per Ltr.
9.	Soap / Liquid Soap	Per Ltr.
10.	Toilet Cleaning Liquid	Per Ltr.
11.	Cleaning Powder (Bleching Powder)	Per Kg.
12.	Washing Powder (Detergent Powder)	Per Kg.
13.	Naphthalene Balls	Per Kg.
14.	Urinal cubes	Per 400 Grm.
15.	Brooms	Per Nos.
16.	Mop Rough duster	Per Nos.
17.	Toilet brush	Per Nos.
18.	Wiper	Per Nos.

Sr. No	Description of item	Total amt. in Rs. (including All Taxes)
19.	Kharata broom	Per Nos.
20.	Mop	Per Nos.
21.	Mugs	Per Nos.
22.	Dustbin (5 ltr.)	Per Nos.
23.	Big Bucket	Per Nos.
24.	Small Bucket	Per Nos.
25.	Towel	Per Nos
26.	Mask (100 Pack)	Per Nos.
27.	Hand Gloves (100 Pack)	Per Nos.
28.	Polythene Garbage Bag (Small Dustbin)	Per Packet
29.	Polythene Garbage Bag (100 Ltr.)	Per Packet

(प्रणाली घोंगे)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(निविदाधारकाचे नाव व शिक्का)